# किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६५/२०२२ मधील निशाणी १ वरील आदेश.
# **CNR NO.MHJG**190008452022

१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार क्र.१– बापु चंद्रभान भिल व अर्जदार क्र.२– दादाभाऊ चंद्रभान भिल यांनी बॉम्बे रेगुलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जातील अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ आहेत. मयत **विरभान सजन भिल** हे अर्जदार क्र.१ व २ यांचे काका आहे व मयत **वाराबाई सजन भिल** या अर्जदार क्र. १ व २ यांची आत्या आहे. मयत **विरभान सजन भिल** हे दिनांक १३/०९/२०२२ रोजी मौजे तरडी, ता. पारोळा, जि. जळगांव येथे मयत झाले आहेत. तसेच मयत **वाराबाई सजन भिल** या अविवाहीत असतांना दिनांक २७/०९/२०२२ रोजी मौजे तरडी, ता. पारोळा, जि. जळगांव येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ व २ यांचे काका मयत **विरभान सजन भिल** यांची पत्नी कलाबाई विरभान भिल या देखील दि.२६/०९/२०२१ रोजी मौजे तरडी, ता. पारोळा, जि. जळगांव येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ व २ यांचे काका मयत **विरभान सजन भिल** यांची पत्नी कलाबाई विरभान यांना सदर विवाह संबंधातुन कोणतेही अपत्य जन्मास आले नव्हते. तसेच अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील मयत चंद्रभान सजन भिल हे दि.१४/०१/२००१ रोजी मौजे तरडी, ता. पारोळा, जि. जळगांव येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्र. १ व २ यांची आई मयत

मिराबाई चंद्रभान भिल या दि.०८/०९/२०१९ रोजी मौजे तरडी, ता. पारोळा, जि. जळगांव येथे मयत झाल्या आहे. त्याप्रमाणे मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांना प्रस्तुत अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. त्यामुळे अर्जदार यांनी ते मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र त्यांना मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे सामाईक नावे मौजे तरडी, ता. पारोळा, जि. जळगांव शिवारातील शेत जमीन गट नं.८८, क्षेत्र ०१ हे. ०९ आर. आकार रु. ४.०५ नये पैसे. ही मिळकत महसुल दप्तरी सामाईक रित्या नोंद असुन सदर शेत मिळकतीस वारसांची नोंद दाखल करण्याकरीता, तसेच इतर शासकिय व निमशासकिय कामाकरीता आवश्यक असल्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व तो मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ अर्जदार क्र.१– बापु चंद्रभान भिल यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी २० वर दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी प्रस्तुत अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केलेली आहे. तसेच अर्जदार यांनी प्रस्तुत कामी नि.३ सोबत अ.क्र.१ वर मयत **विरभान सजन भिल** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, अ.क्र.२ वर मयत **वाराबाई सजन भिल** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, अ.क्र.३ वर मयत **कलाबाई विरभान भिल** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, अ.क्र.४ वर मयत **चंद्रभान सजन भिल** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची छायांकित प्रत, अ.क्र.५ वर मयत **मिराबाई चंद्रभान भिल** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत, अ.क्र. ६ व ७ वर अर्जदार क्र. १ व २ यांचे आधार कार्डची प्रमाणीत प्रत व अ.क्र. ८ वर मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे सामाईक नावे मौजे तरडी, ता.

पारोळा, जि. जळगांव शिवारातील शेत जमीन गट नं.८८, क्षेत्र ०१ हे. ०९ आर. आकार रु. ४.०५ नये पैसे. या शेत मिळकत उता–याची सत्य प्रत, तसेच नि. १५ सोबत अ.क्र. १ वर मयत **चंद्रभान सजन भिल** यांचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच नि.१० सोबत अ.क्र. १ वर दि.२२/११/२०२२ रोजीचे दैनिक लोकशाही मध्ये प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटन दाखल केलेले आहे.

५. प्रस्तुत प्रकरणात दि.२२/११/२०२२ रोजीचे दैनिक लोकशाही मध्ये जाहिर प्रगटन देऊन मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांना प्रस्तुत अर्जातील अर्जदारांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस आहेत काय किंवा प्रस्तुतच्या अर्जास कुणाचा आक्षेप आहे का याबाबत विचारणा करण्यात आली होती. परंतु प्रस्तुत अर्जदारांचे शिवाय मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे वारस असल्याबाबतचा आक्षेप प्रस्तुत प्रकरणात कोणीही हजर होऊन घेतलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात देण्यात आलेला अर्जदार यांचा तोंडी व कागदोपत्री पुराव्यानुसार प्रस्तुत अर्जदार हे मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र असून अर्जदार यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना ते मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात अर्जात नमुद कारणाकरीता व इतर शासकिय व निमशासकिय कामांसाठी ते मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे वारस म्हणुन लावण्यासाठी प्रदाण करणे न्यायोचीत आहे. सबब हे न्यायालय खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार क्र.१– बापु चंद्रभान भिल व अर्जदार क्र.२– दादाभाऊ चंद्रभान भिल हे मयत **विरभान सजन भिल** व मयत **वाराबाई सजन भिल** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात प्रस्तुत अर्जात नमुद कारणासाठी त्याबाबतचे आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर प्रदान करण्यात यावे.

३. अर्जदारांनी क्षतीपुर्ती बंधपत्र (Indemnity Bond) द्यावे.

( एम. एस. काझी )

दिनांक– २७/०६/२०२३. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, पारोळा.